भारतीय रिझर्व बँक
विदेशी चलन विभाग
सेंट्रल ऑफिस
मुंबई ४०० ००१

**आरबीआय – २००४/०५/४९२**
**एपी (डीआयार सिरिज ) परिपत्रक क्र. ४६**

जून १४,२००५

प्रति,

विदेशी चलनाचा व्यवहार करणाऱ्या सर्व बँका

श्रीमती / श्रीमान,

**आंतरराष्ट्रीय डेबिट कार्डस / स्टो अर व्हॅल्यु कार्डस/ चार्ज कार्डस /स्मार्ट कार्डस चा निवासी भारतीयांनी विदेश भेटीत केलेला वापर.**

भारतीय रिझर्व बँकेने परिपत्रक क्र. फेमा /१५/२००० - आर बी. दि.३मे २००० अन्वये डेबीट कार्डस /एटीएम कार्डस किंवा इतर कुठलीही अशी कार्डे ज्यामुळे वित्तिय देणी निर्माण करता येतात त्यांना 'चलन' म्हटले आहे. त्यानंतर एपी (डीआय आर सिरिज) परिपत्रक क्र. ७३, दि.जानेवारी २४, २००३ प्रमाणे स्पष्ट करण्यात आलॆ की, एफईएम (चालु खात्यातील व्यवहार ) नियम २०००च्या नियम ५ मधील निर्बंध आयसीसीं ना त्यांच्या पतमर्यादेपर्यंत लागू नाहीत.

अ) आंतरराष्ट्रीय डेबीट कार्डे

२) असे समजते की विदेशी चलनाचा व्यवहार करण्याचा अधिकार असलेल्या बँका आंतरराष्ट्रीय डेबीट कार्डे (आय डी सी ) देत आहेत, ज्यां वरुन निवासी व्यक्ती विदेशी भेटीत /प्रवासात पैसे काढू शकतील किंवा तेथील व्यापाऱ्यांचे देणे देऊ शकतील. असे स्पष्ट करण्यात येते की, ही कार्डे फक्त परवानगी दिलेल्या चालू खाते व्यवहारांसाठी व वर्गीकृत खर्चांच्या अधिकृत मर्यादेपर्यंतच वापरता येतील. या मर्यादा भारत सरकारच्या अधिसूचना क्र. जीएसआर ३८/ई मे ३, २००० (वेळोवेळी केलेल्या बदलांसह) च्या परिशिष्टांप्रमाणे घालून दिलेल्या आहेत.

३) आणखी स्पष्ट करण्यात येते की आयडीसीज इंटरनेटवर, निषिध्द /निर्बंधित वस्तू व सेवांसाठी, उदा. लॉटरी तिकिटे, निर्बंधित पुस्तके, स्वीपस्टेकमध्ये सहभाग, कॉलबॅक सेवा वगैरेसाठी वापरता येणार नाहीत. कारण या वस्तू व सेवांसाठी विदेशी चलन खर्च करण्याची अनुमती नाही.

४) कागदपत्रे व अहवाल :
आयडीसी देतांना एडी बँकांनी, विदेशी चलन देतांना उपयुक्त कागदपत्रे , कार्यपध्दती वापरायची आहे.याशिवाय एडी बँकाच्या आंतरराष्ट्रीय बँकिंग विभाग /विदेशी मुद्रा विभाग यांनी एका वर्षात आयडीसी वर एकूण यु एस डॉलर्स १००,००० च्या वर विदेशी चलनाचा खर्च झाल्यास एक अहवाल दाखल करायचा आहे. (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे) हा अहवाल प्रमुख साधारण व्यवस्थापक, विदेशी मुद्रा विभाग, विदेशी खर्च विभाग, केंद्रीय कार्यालय, मुंबई ४०००0१ येथे पुढच्या वर्षाच्या जानेवारी २० पर्यंत पाठवायचा आहे.

(ब) स्टोअर व्हॅल्यु कार्डे / चार्ज कार्डे / स्मार्ट कार्डे इत्यदि :-

५) आमच्या असे निदर्शनास आले आहे की काही एडी बँका परदेशात प्रवास करणाऱ्या निवासी व्यक्तींना, स्टोअर कार्डे /चार्ज कार्डे /स्मार्ट कार्डे देतात व या कार्डांवरुन परदेशी व्यापाऱ्यांना पैसे देणे व एटीएम मधून पैसे काढणे शक्य होते. रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी अशा कार्डासाठि घेणे आवश्यक नाही. परंतु अशी कार्डे फक्त परवानगी दिलेल्या चालू खाते व्यवहारांसाठी व वर्गीकृत खर्चाच्या अधिकृत मर्यादेपर्यंतच वापरता येतील . या मर्यादा विदेशी मुद्रा व्यवस्थापन (चालु खात्यातील व्यवहार ) नियम ,२००० मध्ये वेळोवेळी केलेल्या बदलांप्रमाणे विहित आहेत.

६) एडी बँकांनी, या परिपत्रकातील माहिती, ग्राहक व संबंधितांना द्यावी.

७) या परिपत्रकातील निर्देश फेमा १९९९ चा ४२)च्या कलम १०(४) व ११(१) अन्वये दिले आहेत. ते इतर कुठल्याही संबंधित कायद्याच्य तरतुदींवर परिणाम करणार नाहीत.

आपला विश्वासू

विनय बैजल
प्रभारी महाव्यस्थापक

सहपत्रः-
नमुना
आयडीबीसी मार्फत युएस डॉलर्स १०,००० च्या वर एका कॅलेंडर वर्षात झालेल्या विदेशी चलनाचा अहवाल - डिसेंबर ३१, .... पर्यंत

बँकेचे नाव

| खातेदाराचे नाव | रक्कम युएसडॉआलर्स मध्ये | | शेरा |
|---|---|---|---|
| | रोख काढलेली | व्यापारी संस्थाना दिलेली | |
| | | | |

सही

नाव व पद
तारीख
शिक्का